**Fermenta Biotech Limited** *(formerly known as DIL Limited)*
CIN: L99999MH1951PLC008485
Regd. Office: A - 1501, Thane One, DIL Complex, Ghodbunder Road, Majiwade, Thane (W) - 400 610, Maharashtra, India.
Tel. : +91-22-6798 0888 Fax. : +91-22-6798 0899
Email : info@fermentabiotech.com, Website. : www.fermentabiotech.com

Ref: F.No.:908

February 12, 2025

**Corporate Relations**
**BSE Limited,**
**Phiroze Jeejeebhoy Towers,**
**Dalal Street, Fort,**
**Mumbai – 400 001**

Sir,

**Sub: Publication of unaudited Financial Results for the quarter and nine months ended December 31, 2024.**

**Ref: Code No. 506414**

Pursuant to Regulation 47 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 and in continuation of our earlier intimation dated February 11, 2025, regarding declaration of unaudited financial results for the quarter and nine months ended December 31, 2024, we are enclosing herewith copy of the newspaper publications published in Business Standard and in Sakal dated February 12, 2025 for your reference and record.

Thanking you,

Yours faithfully,
For **Fermenta Biotech Limited**

VARADVINAYAK VIJAY KHAMBETE
Digitally signed by VARADVINAYAK VIJAY KHAMBETE
Date: 2025.02.12 12:04:50 +05'30'

**Varadvinayak Khambete**
**Company Secretary & Head - Legal**
Membership No. A33861

Encl: as above

# आपत्ती प्राधिकरणावर शिंदे

## शिवसेनेच्या नाराजीनंतर सुधारित फेररचना जाहीर

सकाळ न्यूज नेटवर्क

मुंबई, ता. ११ : राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची नियुक्ती करुन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिंदे यांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र शिवसेनेच्या मंत्र्यांनी त्यांच्या हक्कांवर गदा आणली जात असल्याबाबत मंत्रिमंडळात नाराजी व्यक्त केली.

राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची फेररचना नुकतीच करण्यात आली होती. मात्र त्यामध्ये अर्थमंत्री म्हणून उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा समावेश असला तरी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा समावेश करण्यात आला नव्हता. त्यामुळे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली होती. त्यामुळे आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत या प्राधिकरणाची पुन्हा सुधारित फेररचना करण्यात आली असून यामध्ये मुख्यमंत्री या प्राधिकरणाचे पदसिद्ध अध्यक्ष आणि दोन्ही उपमुख्यमंत्री हे पदसिद्ध सदस्य असतील, अशी दुरुस्ती करण्यात आली आहे. प्राधिकरणावर शिंदे यांना घेतल्याने शिवसेनेची नाराजी दूर होण्यास मदत होणार आहे.

### शिवसेनेत अस्वस्थता

मंत्रिमंडळ बैठकीच्या विषय पत्रिकेवरील विषय संपल्यानंतर सर्व सचिवांना बैठकीबाहेर जाण्यास सांगण्यात आले. त्यानंतर जवळपास १५ मिनिटे 'बंद' दाराआड याबाबत चर्चा झाल्याचे सूत्रांनी सांगितले. शिवसेनेने उपस्थित केलेला पालकमंत्रिपदाचा वाद अद्याप संपलेला नसून त्यावर मार्ग काढलेला नाही. त्यानंतर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक आणि उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या खात्यात हस्तक्षेप केला जात असतानाच आता खुद्द एकनाथ शिंदे यांनाच प्राधिकरणातून बाहेर ठेवण्याचा प्रयत्न करण्यात आल्याने शिवसेनेत अस्वस्थता निर्माण झाली आहे.

### 'जनाई शिरसाई'साठी ४३८ कोटींचा निधी

पुणे जिल्ह्यातील दौंड, बारामती व पुरंदर तालुक्यातील सिंचनासाठीच्या जनाई, शिरसाई उपसा सिंचन योजनेच्या कालव्यांना बंदिस्त नलिका वितरण प्रणालीमध्ये रूपांतर करण्याच्या कामासाठी ४३८ कोटी ४७ लाख ८७ हजार ४८३ रुपयांच्या खर्चास मान्यता देण्यात आली.

### देहरजी प्रकल्पासाठी सुधारित खर्च मान्य

पालघर येथे बांधल्या जाणाऱ्या विक्रमगड तालुक्यातील देहरजी मध्यम पाटबंधारे प्रकल्पासाठी दुसऱ्यांदा जवळपास शंभर टक्के खर्च वाढीच्या प्रस्तावाला आज मंजुरी देण्यात आली. दोन हजार ५९९ कोटी १५ लाख रुपयांच्या खर्चास सुधारित प्रशासकीय मंजुरी दिली आहे.




# नोटाबंदीतील १०१ कोटींचे मूल्य शून्य

## राज्यातील आठ जिल्हा बँका नऊ वर्षे न्यायाच्या प्रतीक्षेत

विष्णू मोहिते : सकाळ वृत्तसेवा

सांगली, ता. ११ : राज्यातील आठ जिल्हा बँकांकडे नोटीबंदी काळापासून पडून असलेल्या १०१.१८ कोटींची रक्कम बँकाच्या दप्तरी जपून ठेवली असली तरी केवळ कागदी तुकड्यांचा ढीग एवढेच त्याचे महत्त्व उरले आहे.

बँकेच्या हिशेबी केवळ शिल्लक रक्कम असे, या रकमांचे स्वरूप गेल्या आठ वर्षांपासून आहे. लेखाधिकारी व 'नाबार्ड'ने २०२३-२४ च्या नफा वाटणीत या रकमांची तरतूद करण्याची सूचना केल्याने आता हा पैसा 'खोटा' असे म्हणायची वेळ आता बँकांवर आली आहे.

याबाबतचे दावे सध्या सर्वोच्च न्यायालय व केंद्रीय अर्थ सचिवांपुढे प्रलंबित असल्याने या नोटा जपाव्या लागत आहेत. काळा पैसा चलनातून कायमचा हद्दपार करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ८ नोव्हेंबर २०१६ रोजी रात्री आठ वाजता पाचशे व हजार रुपयांच्या नोटा चलनातून बाद करण्याचा निर्णय घेतला. त्यावेळी त्यांनी स्मितहास्य करीत त्या नोटा केवळ कागदाचा तुकडा असल्याचे जाहीर केले होते. त्यांचे हे शब्द या जिल्हा बँकांबाबत शब्दशः खरे ठरले आहेत. गेली आठ वर्षे या नोटा पडून होत्या. त्या नोटाएवढी तरतूदच नफ्यातून करायला लावली गेल्याने खरोखरच या नोटा आता 'कागज का तुकडा' ठरल्या आहेत.

नोटाबंदीतील राज्यातील जिल्हा बँकांची अडकलेली ही रक्कम कदाचित देशात सर्वाधिक असावी. आजही या नोटा बदलून द्याव्यात यासाठी सर्वोच्च न्यायालय तसेच उच्च न्यायालयाच्या सूचनेप्रमाणे केंद्रीय अर्थ सचिवांकडे अपील दाखल केले आहे. निकाल आमच्या बाजूने लागला तरच आशा आहे, असे सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शिवाजीराव वाघ यांनी सांगितले.

### जिल्हा बँकनिहाय शिल्लक रक्कम (कोटीत)



| | |
|---|---|
| पुणे | २२.२५ |
| कोल्हापूर | २५.२७ |
| सांगली | १४.७२ |
| नाशिक | २१.३२ |
| अहिल्यानगर | ११.६८ |
| वर्धा | ०.७८ |
| नागपूर | ५.०२ |
| अमरावती | ०.११ |

### व्याजाचा भुर्दंड

सांगली जिल्हा बँकेकडे १४.७२ कोटी रुपयांच्या नोटा शिल्लक आहेत. या शिल्लक नोटांना 'एसबीएन' (स्पेसिफाइड बँक नोट्स) असे म्हणतात. नोटाबंदीनंतर पाचशे आणि हजारांच्या नोटांचा उल्लेख असा केला जातो. थोडक्यात नोटा आहेत मात्र त्यांची किंमत शून्य आहे. या नोटा शून्य किमतीच्या असल्या तरी जपून ठेवणे कायद्याने बंधनकारक आहे. गेल्या वर्षापर्यंत या नोटा बँकांकडे पडून असल्याने त्याचा व्याजाचा भुर्दंड बँकांना बसला. आता नफ्यातून त्याची तरतूद केल्याने या नोटा थोडक्यात शून्य किमतीच्या 'नॉन परफॉर्मिंग ॲसेट' ठरल्या आहेत. त्यांची जपणूक करण्याचा खर्च बँकांना करावा लागत आहे.


**fbl**

**Fermenta Biotech Limited**

(CIN:L99999MH1951PLC008485)

Regd. Office: A-1501, Thane One, DIL Complex, Ghodbunder Road, Majiwada, Thane (West) 400 610, Maharashtra, India.

**EXTRACT OF CONSOLIDATED UNAUDITED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER AND NINE MONTHS ENDED DECEMBER 31, 2024**

( Amount in Rs Lakhs )

| Particulars | Quarter Ended 31.12.2024 (Unaudited) | Quarter Ended 30.09.2024 (Unaudited) | Quarter Ended 31.12.2023 (Unaudited) | Nine Months Ended 31.12.2024 (Unaudited) | Nine Months Ended 31.12.2023 (Unaudited) |
|---|---|---|---|---|---|
| Total income from operations | 15,869.61 | 9,790.82 | 10,149.09 | 33,755.38 | 24,475.02 |
| Profit/(Loss) before Exceptional Items and tax | 4,533.67 | 1,182.24 | 1,607.23 | 5,122.61 | (335.55) |
| Exceptional Items | - | - | - | - | (742.64) |
| Profit/(Loss) after Exceptional Items and before tax | 4,533.67 | 1,182.24 | 1,607.23 | 5,122.61 | (1,078.19) |
| Net Profit / (Loss) after tax | 3,789.01 | 1,112.23 | 998.96 | 4,307.94 | (1,686.46) |
| Equity Share Capital | 1,457.73 | 1,449.89 | 1,443.71 | 1,457.73 | 1,443.71 |
| Reserves (excluding Revaluation Reserve as shown in the Balance Sheet of previous year) | 27,442.39 (As on 31/03/2024) | 27,442.39 (As on 31/03/2024) | 30,088.51 (As on 31/03/2023) | 27,442.39 (As on 31/03/2024) | 30,088.51 (As on 31/03/2023) |
| Earnings per share (EPS) (before Extraordinary items) (of Rs.5/- each) | | | | | |
| -Basic (Rs.) | 12.71 | 3.94 | 3.41 | 14.67 | (3.01) |
| -Diluted (Rs.) | 12.71 | 3.94 | 3.41 | 14.67 | (3.01) |
| Earnings per share (EPS) (after Extraordinary items) (of Rs.5/- each) | | | | | |
| -Basic (Rs.) | 12.71 | 3.94 | 14.57 | 14.67 | (5.59) |
| -Diluted (Rs.) | 12.71 | 3.94 | 14.57 | 14.67 | (5.59) |

**STANDALONE FINANCIAL SUMMARY**

( Amount in Rs Lakhs )

| Particulars | Quarter Ended 31.12.2024 (Unaudited) | Quarter Ended 30.09.2024 (Unaudited) | Quarter Ended 31.12.2023 (Unaudited) | Nine Months Ended 31.12.2024 (Unaudited) | Nine Months Ended 31.12.2023 (Unaudited) |
|---|---|---|---|---|---|
| Total income from operations (net) | 14,847.28 | 9,249.06 | 9,192.80 | 31,628.86 | 22,409.19 |
| Profit/(Loss) before Exceptional Items and tax | 4,244.42 | 885.70 | 1,777.98 | 4,645.09 | 358.61 |
| Exceptional Items | - | - | - | - | (900.00) |
| Profit/(Loss) after Exceptional Items and before tax | 4,244.42 | 885.70 | 1,777.98 | 4,645.09 | (541.39) |
| Net Profit / (Loss) after tax | 3,499.76 | 815.69 | 1,169.71 | 3,830.42 | (1,149.66) |

**Note :**
The above is an extract of the format of unaudited financial results for quarter and nine months ended December 31, 2024 filed with stock exchange under regulation 33 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The aforesaid financial results in full format as filed with the stock exchange are available on the Company's website www.fermentabiotech.com and on BSE website www.bseindia.com, and can also be accessed by scanning the Quick Response Code provided herewith.

Place : Thane
Date : 11th February 2025

Sd/-
Prashant Nagre
Managing Director
DIN No: 00003255

FBL / 80 / PREM ASSOCIATES


# 'महा हॅकेथॉन चॅलेंज १.०'चे उद्घाटन

सकाळ न्यूज नेटवर्क

मुंबई, ता. ११ : माहिती तंत्रज्ञान विषयक विविध समस्यांवर उपाय सुचविण्यासाठी 'महा हॅकेथॉन चॅलेंज १.०' स्पर्धेचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मंगळवारी येथे उद्घाटन झाले.

राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर झालेल्या कार्यक्रमात स्पर्धेचे उद्घाटन झाले. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार, मंत्रिमंडळातील अन्य सदस्य उपस्थित होते.

राज्य सरकारची माहिती तंत्रज्ञान विभाग आणि केंद्र सरकारच्या माहिती तंत्रज्ञान विभागाच्या 'भाषिणी' यांच्या दरम्यान एक सामंजस्य करार झाला आहे. त्यांच्या वतीने आयोजित केलेल्या या स्पर्धेत तंत्रज्ञान क्षेत्रात नवे प्रयोग करणारे, संशोधक आणि उद्योजक, स्टार्टअप यांच्यासाठी ही स्पर्धा आहे. विविध समस्यांवर प्रभावी आणि स्वदेशी उपाय उपलब्ध व्हावेत यासाठी ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

### स्पर्धेसाठी विषय

'कृत्रिम बुद्धिमत्तेचा शासनात वापर', 'आपत्ती व्यवस्थापनात ड्रोनचा वापर', प्रतिबंधित क्षेत्रात ड्रोनविरोधी तंत्रज्ञानाचा वापर', 'भाषिणीचा वापर करून थेट स्पीच अनुवाद' असे विषय स्पर्धेसाठी आहेत.

### स्पर्धेचे वेळापत्रक

- उद्घाटन : ११ फेब्रुवारी
- स्पर्धकांच्या शंका समाधान : १४ फेब्रुवारी
- नोंदणीची शेवटची तारीख : २२ फेब्रुवारी
- सादर कल्पनांचे तपशीलवार मूल्यांकन आणि दहा गटांची निवड : २८ फेब्रुवारी
- प्रत्येक गटातील पहिल्या पाच संघांची निवड : ७ मार्च
- अंतिम सादरीकरण व प्रत्येक गटातील तीन विजेत्या संघाची निवड : २० मार्च
- विजेत्यांची घोषणा -२५ मार्च

### बक्षिसाचे स्वरूप

- प्रत्येक गटातील प्रथम तीन संघांना त्यांच्या उपाययोजना लागू करण्यासाठी अर्थसाह्य आणि समर्थन मिळेल
- पहिल्या तीन गटांसाठी पंधरा लाख रुपये आणि प्रमाणपत्र
- चौथ्या गटांसाठी पाच लाख रुपये आणि प्रमाणपत्र
- विजेत्या उपाययोजनांना राज्य सरकारच्या वतीने कार्यवाही आणि देखभालीसाठी नियुक्त केले जाईल
- नियुक्तीनंतर पहिल्या तीन गटांना दीड लाख रुपये प्रति वर्ष तर चौथ्या गटांसाठी पन्नास हजार रुपये प्रति वर्ष दिले जाणार

# 'मविआ' खासदारांची निदर्शने

नवी दिल्ली, ता. ११ : महाराष्ट्रात सोयाबीन खरेदीसाठी मुदतवाढ मिळावी म्हणून आज लोकसभेतील महाविकास आघाडीच्या खासदारांनी संसद भवनाच्या परिसरात निदर्शन केले.

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या सुप्रिया सुळे, नीलेश लंके, काँग्रेसच्या प्रणिती शिंदे, प्रतिभा धानोरकर, वर्षा गायकवाड, डॉ. प्रशांत पडोळे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे ओमराजे निंबाळकर यांच्यासह दहा खासदारांनी मुदतवाढीची मागणी करीत निदर्शने केली. केंद्राच्या धोरणांमुळे सोयाबीनचे दर अकरा हजार रुपयांवरून ३८०० रुपयांवर गडगडले आहे.

## सकाळ कनेक्ट

SIILC Transforming Human Capital

### सीएसआर प्रशिक्षण

पुणे, ता. ११ : एनजीओ व सामाजिक काम करणाऱ्या संस्थांना आर्थिक गरज मोठ्या प्रमाणात असते. सीएसआर निधीमधून त्यांना ही गरज भागवता येते. मात्र हा निधी कसा मिळवावा, यासाठीचे नियम व कायदे काय आहेत, संस्थेचा अहवाल कसा सादर करावा याची बहुतेकांना माहिती नसते. या पार्श्वभूमीवरील सीएसआर प्रशिक्षण १५ व १६ फेब्रुवारीला आयोजिले आहे. यामध्ये सीएसआर नेमके काय आहे, सीएसआर कायदा, अंमलबजावणी संस्थांची भूमिका, रिपोर्टींग फ्रेमवर्क, अंमलबजावणी करण्यापूर्वी, दरम्यान आणि नंतरची प्रक्रिया, सरकारच्या अपेक्षा, भूमिका आणि जबाबदाऱ्या, सीएसआर निधीसाठी कागदपत्रे व प्रक्रिया आदी बाबींवर मार्गदर्शन होणार आहे. हे प्रशिक्षण समाजसेवी संस्था, फाउंडेशन्स, सीएसआर क्षेत्रात कार्यरत कंपन्यांचे अधिकारी तसेच विद्यार्थी यांना उपयुक्त आहे. डॉ. अनिल धनेश्वर हे कार्यशाळेला प्रमुख मार्गदर्शन करतील.

संपर्क : ८४८४८११५४४

### महाराष्ट्रीयन चटण्यांचे प्रकार शिका

जेवणातील चव वाढविणाऱ्या खमंग, स्वादिष्ट आणि रुचकर अशा विविध पद्धतीच्या महाराष्ट्रीयन चटणी प्रात्यक्षिकासह शिकवणारी कार्यशाळा १६ फेब्रुवारीला आयोजिली आहे. रोजच्या आहारामध्ये चटण्यांचे सेवन केल्यामुळे आरोग्याला मोठे फायदे होतात. या अनुषंगाने कार्यशाळेत सोलापुरी शेंगदाणा, खोबरे, लसूण, कढीपत्ता, कारले, टोमॅटो, कांदा; पांचाली, थ्री इन वन, आवळा, कोर्टा, जवस अशी विविध प्रकारच्या चटण्या तसेच दक्षिण भारतीय इडली, भात इ.सोबत खाल्ली जाणारी गन पावडर शिकवली जाणार आहे. व्यावसायिक कार्यशाळा असल्याने चटणी व्यवसाय कमी भांडवलामध्ये कसा सुरु करावा, व्यवसायाला असणारी मागणी, त्यामधील नावीन्यपूर्ण पद्धती, मिळणारा नफा चटणी टिकवण्याची पद्धत व पॅकिजिंग याबद्दलही माहिती दिली जाणार आहे.

संपर्क : ८४८४८११५४४

### शासकीय एस्टिमेट प्रशिक्षण

शासकीय कामांचे मूल्यनिर्धारण, एस्टीमेशन हे बांधकाम, स्थापत्य विभागातील, कॉन्ट्रॅक्टर, विद्यार्थ्यांना उपयुक्त असे प्रशिक्षण २० व २१ फेब्रुवारीला आयोजित केले आहे. यात पीडब्ल्यूडी, एसएसआर, रेट, नियमावली, टेस्टिंग, मेजरमेन्ट शीट, रेट तपासणी, चार्ट, एस्टीमेशन सॉफ्टवेअर व एस्टीमेशन बनविणे, तयार करणे, समाज मंदिर, सभा मंडप, शाळा, अंगणवाडी, सुरक्षा भिंत आशा प्रकारचे कामे व एस्टीमेशन आदींबाबत मार्गदर्शन करण्यात येईल.

संपर्क : ९३५६९७३४२७

### पाळीव प्राण्यांच्या व्यवसायाविषयी मार्गदर्शन

पाळीव प्राणी उद्योग झपाट्याने विस्तारत आहे, वाढत्या मागणीमुळे या व्यवसायात अनेक संधी उपलब्ध आहेत. या पार्श्वभूमीवर याबाबत सर्वसमावेशक मार्गदर्शन करणारी तसेच याच्या बिझनेस टू बिझनेस व्यवसाय संधींविषयी माहिती देणारी कार्यशाळा २३ फेब्रुवारीला आयोजिली आहे. यात या व्यवसायाचा परिचय व परीघ, आर्थिक महत्त्व, आव्हाने, संधी, उदयोन्मुख तंत्रज्ञान, सेवा व ट्रेंड, ग्राहकांची मागणी, पाळीव प्राण्यांचा व इतर सहायक उपकरणांचा पुरवठा, पशुवैद्यकीय सेवा, प्रशिक्षण सेवा, पाळीव प्राणी काळजी सेवा, डॉग शो, पेट-टेक स्टार्टअप, व्यवसायाच्या संधीसाठी विशिष्ट आवश्यक मूलभूत कौशल्ये आदींविषयी मार्गदर्शन होणार आहे. नवीन व्यवसाय सुरू करण्याची इच्छा असणाऱ्यांसाठी, व्यवसायामध्ये विविधता आणू इच्छिणाऱ्यांसाठी किंवा व्यवसाय वाढवू इच्छिणाऱ्यांसाठी ही कार्यशाळा उपयुक्त आहे.

संपर्क : ८४८४८११५४४

कार्यशाळांची माहिती मिळवण्यासाठी व नावनोंदणीसाठी क्यूआर कोड स्कॅन करावा.


**मुंबई महानगर प्रदेश लोखंड व पोलाद बाजार समिती**
**THE MUMBAI METROPOLITAN REGION IRON & STEEL MARKET COMMITTEE**
केंद्रीय सुविधा इमारत, कळंबोली, ता. पनवेल, जि. रायगड, नवी मुंबई - ४१० २१८.
Central Facility Building, Kalamboli, Tal. Panvel, Dist. Raigad, Navi Mumbai- 410218.
• Phone : 27420389 / 27422137 • Mob. 9969 000071 • Email: mmrismc@gmail.com

संदर्भ क्रमांक / Ref. No. : MMRI & SMC/109/2025 दिनांक / Date :11/2/2025

**जाहीर सूचना**

मुंबई महानगर प्रदेश विनिर्दिष्ट विक्रेय वस्तू बाजारपेठा (स्थल नियमन) अधिनियम १९८३ मधील नियम क्र.७ व ३३ अन्वये आणि उपविधीतील नियम क्र २४ अन्वये मुंबई महानगर प्रदेश लोखंड व पोलाद बाजार समितीच्या बाजार आवारात जे व्यापारी लोखंड व पोलादाचा घाऊक व्यापार करतात त्यांनी बाजार समितीकडून अनुज्ञप्ती घेणे बंधनकारक आहे.

मुंबई महानगर प्रदेश लोखंड व पोलाद बाजार समिती, कळंबोली निवडणूका विनियम २००८ नुसार बाजार समितीच्या कार्यकारीणीवर ६ सदस्यांची निवडणुकीद्वारे नियुक्ती करण्यात येणार आहे. त्याकरिता निवडणुकीचा कार्यक्रम लवकरच घोषीत करण्यात येणार आहे. सदर निवडणूक लढविणे व निवडणूकीत मतदान करण्याचा हक्क बाजार आवारात विनिर्दिष्ट विक्रेय वस्तूचा व्यापार करणाऱ्या वैध अनुज्ञप्तीधारकांस असेल.

निवडणूक प्रक्रियेत अधिकाधीक व्यापारी सदस्यांना भाग घेता यावा याकरिता याद्वारे असे निर्देशीत करण्यात येते की, जे लोखंड व पोलादाचे अधिकृत व्यापारी कळंबोली बाजार आवारात कार्यरत असतील त्यांनी बाजार समितीच्या कार्यालयात अनुज्ञप्ती मिळण्यासाठी अर्ज करून पुढील प्रक्रिया पूर्ण करावी. तसेच आधीपासून जे व्यापारी अनुज्ञप्तीधारक आहेत त्यांनी त्यांचा अनुज्ञप्ती वैधतेचा कालावधी संपला असल्यास / पुढील काही दिवसांत संपणार असल्यास, अनुज्ञप्तीचे नुतनीकरण लवकरात लवकर करून घेण्याची दक्षता घ्यावी. निवडणूक घोषीत झाल्यानंतर अर्ज करणाऱ्या व्यांपाऱ्यांना मतदान प्रक्रियेत सहभागी होता येणार नाही, याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

मुख्य कार्यकारी अधिकारी



**कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ (म्हाडाचा घटक)**
म्हाडाची वेबसाईट: https://mhada.gov.in
म्हाडा MHADA

Demand Assessment Survey 2025

**स्वप्नातील घर शोधत आहात...!**
**अंबरनाथमध्ये प्रथमच म्हाडाचा गृहनिर्माण प्रकल्प**

शिवगंगानगर, अंबरनाथ, जि. ठाणे येथे सर्व्हे क्र. ३८[पै] ७० व ७८ येथे १५१ अत्यल्प उत्पन्न गट सुमारे ३०चौ. मी. क्षेत्रासह व ७७४ मध्यम उत्पन्न गट सुमारे ६७ चौ. मी. क्षेत्रासह म्हाडाचा गृहनिर्माण प्रकल्प. परवडणाऱ्या किंमतीमध्ये रु. २० ते २२ लाखामध्ये [अंदाजित] (अत्यल्प उत्पन्न गट) व ५० लाखामध्ये अंदाजित (मध्यम उत्पन्न गट) स्वप्नातील घर उपलब्ध होणार आहे.

तुमच्या स्वप्नातील घराच्या प्रकल्पासाठी मागणी निर्धारण सर्वेक्षण (Demand Assessment) करीत आहोत. त्यामुळे लवकरात लवकर या सर्वेक्षणामध्ये सहभाग घ्या.

सर्वेक्षण सुरु होण्याची तारीख :- ११/०२/२०२५
सर्वेक्षणाची शेवटची तारीख :- २८/०२/२०२५

https://demandassessmentcitizen.mhada.gov.in/ या लिंकवर क्लिक करून सर्वेक्षणात सहभागी व्हा.
तसेच आमच्याशी ०२२-६६४०५०२९ या दूरध्वनी क्रमांकावर थेट संपर्क साधा.
थेट साईटला भेट द्या:- https://maps.app.goo.gl/h4KJ4ojECHMnwrCU9
प्रकल्प उभारणीकरिता आपला अभिप्राय अवश्य नोंदवा.

CPRO/A/८९

(सही/-)
कार्यकारी अभियंता - २
कोकण मंडळ, म्हाडा.

म्हाडा- गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था



**सेतू केंद्र सुविधा स्थापित करण्यासाठी**
**ई-निविदा**

सामान्य प्रशासन विभाग यांचे कडील शासन निर्णय क्र. आसेके-१०२२/सेतू/प्र.क्र.११९/मावतं दिनांक १९ जुलै २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये पालघर जिल्यामध्ये सेतू केंद्राच्या ऐजन्सीची मुदत संपुष्टात आली असल्याने सेतू केंद्र सुरु करण्याबाबतची निवीदा प्रक्रीया तात्काळ सुरु करणेबाबतचे निर्देश देण्यात आले आहेत.

त्याअनुषंगाने पालघर जिल्हयातील सेतू सुविधा स्थापित करणेसाठीच्या ई-निवीदा mahatenders.gov.in तेसच palghar.gov.in या संकेतस्थळावर दिनांक १३.०२.२०२५ सकाळी ११.०० वाजेपासून ते दिनांक २८.०२.२०२५ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत ऑनलाईन उपलब्ध असेल. तरी सेतू सुविधा केंद्र स्थापित करणेसाठी अनुभवी व सुयोग्य इच्छुक अभिकर्त्याकडुन ई-निवीदा मागविण्यात येत आहे. अधिक माहितीसाठी mahatenders.gov.in तेसच palghar.gov.in या संकेतस्थळावर भेट द्यावी.

स्वाक्षरी/-
(गोविंद बोडके)
जिल्हाधिकारी पालघर

आरओसी-२०२४-२५/क्र.-५/C६३०८